श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती सेवामंडळ
श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर, पुणे

श्रीसद्‌गुरू वासुदेवानंतसरस्वती तथा श्री बाबामहाराज सहस्रबुद्धे

# जयंती उत्सव

| डिसेंबर २०२२ | विशेषांक | खासगी वितरणासाठी | पाने १२ |

## सद्गुरू श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे यांचा १३९ वा जयंती उत्सव




*डावीकडून: पंडितप्रवर कुप्पा श्रीगुरू बिल्वेश शर्मा, श्री. विकासराव वालावलकर, डॉ. मनमोहन उपाध्याय आणि वे. मू. अथर्व पटवर्धन*

पुणे येथे श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती तथा श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे यांचा १३९ वा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. दि. ३ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते आणि त्याला भक्तगणांचा प्रतिसाद अत्यंत उत्साहपूर्ण होता. दि. ३ ते ६ नोव्हेंबर या काळात सकाळी ह.भ.प. सौ. अर्चना कुलकर्णी, ह.भ.प.जयंत गोसावी, ह.भ.प. आनंदी कऱ्हाडकर, ह.भ.प. श्रीपाद अभ्यंकर यांची कीर्तने आणि सायंकाळी नीलाताई अभ्यंकर आणि आचार्य पद्मनाभ व्यास यांची प्रवचने यांचे आयोजन करण्यात आले होते.

**सोमवार, दि. ७ नोव्हेंबर २०२२; कार्तिक शु.।। १४ , शक १९४४** रोजी सकाळी ध्वजपूजनाने उत्सवाच्या मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. सामुदायिक नामस्मरण, सामुदायिक उपासना, उपनिषद पठण, लघुरुद्राभिषेक, आचार्य पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन, दुपारी ह.भ.प. रामनाथबुवा अय्यर यांचे कीर्तन, महाप्रसाद आदी कार्यक्रमानंतर सायंकाळी पाठांतर स्पर्धा पारितोषिक आणि पाठशाळेच्या परीक्षांचे प्रमाणपत्र वितरण; तसेच विद्वज्जनांचा सत्कार यासाठी एका समारंभाचे आयोजन केलेले होते.

### पारितोषिक आणि प्रमाणपत्र वितरण तसेच विद्वज्जनांचा सत्कार समारंभ

सोमवार, दि. ७ नोव्हेंबर २०२२; कार्तिक शु.।। १४, शक १९४४ या दिवशी सायंकाळी ५.०० वाजता विद्वत सत्कार आणि पाठांतर स्पर्धा आणि वेदपाठशाळा परीक्षांचे निकाल आणि



*सूत्रसंचालक श्री. विवेक सरस्वते*



*वे. मू. मनोज जोगळेकर आणि वे. मू. समीर मिराशी : ईशस्तवन*

पारितोषिक वितरण समारंभ प्रतिवर्षाप्रमाणेच आयोजित करण्यात आला होता. या समारंभाचे अध्यक्ष म्हणून पाणिनी विश्वविद्यालय (उज्जैन)चे उपकुलपती डॉ. मनमोहन उपाध्याय यांना निमंत्रित करण्यात आलेले होते.

समारंभाच्या प्रारंभी वे. मू. मनोज जोगळेकर आणि वे.मू. समीर मिराशी यांनी ईशस्तवन केले आणि सूत्रसंचालक श्री. विवेक सरस्वते यांनी समारंभाचे प्रास्ताविक केले. ते म्हणाले 'गेली अनेक दशके सातत्याने घेण्यात येत असलेल्या पारितोषिक वितरण समारंभाचे अध्यक्षस्थान आजवर अनेक मान्यवर पंडितांनी भूषविले आहे. उदाहरणादाखल सांगायचे झाले तर पंडितप्रवर श्री. आर. रामकृष्णभट्ट, पंडितप्रवर राजेश्वरशास्त्री भालचन्द्रशास्त्री जोशी, आचार्य श्री. दिव्यचेतन ब्रह्मचारी, विद्यावाचस्पती राजाराम जयराम शुक्ल यांसारख्या अनेक वेदाध्ययन व संस्कृत भाषा क्षेत्रातील नामांकित दिग्गजांनी ह्या व्यासपीठावरून आपले विचार मांडले. अगदी त्याच परंपरेत बसणारे आजच्या समारंभाचे नियोजित अध्यक्ष पंडितप्रवर श्री. मनमोहन उपाध्याय हे आहेत'

वे. मू. प्रसाद निगुडकर यांनी अध्यक्षांचा परिचय करून दिला. 'पंडितप्रवर मनमोहन उपाध्याय यांनी १९९२ मध्ये 'संस्कृत फलित ज्योतिष' हा विषय घेऊन अवधेशप्रताप सिंग विद्यापीठ, मध्य प्रदेश, येथून पदवी संपादन केली. १९९७ मध्ये संपूर्णानंद संस्कृत विद्यापीठ, वाराणसी येथून त्याच विषयात 'शास्त्री' ही पदवी संपादन केली. देवी अहिल्या विद्यापीठ ईंदोर, मध्यप्रदेशमध्ये त्यांनी सादर केलेल्या प्रबंधाबद्दल त्यांना 'डॉक्टरेट' देऊन सन्मानित करण्यात आले आहे. ३० पेक्षा जास्त वर्षे ते अध्यापन क्षेत्रात प्राचार्य, उपकुलगुरू, कुलगुरू अशा विविध पदांवर कार्यरत होते. योग्य वास्तू, पौरोहित्य, जन्मपत्री, आर्य व प्राचीन भारतीय वैज्ञानिक आदी संस्कृत पुस्तकांचे त्यांनी संपादन केले आहे, शिवाय अन्य अनेक विषयांवर संस्कृतमध्ये विपुल लेखन केले आहे. मध्यप्रदेश सरकारचा सहावी ते बारावीचा संस्कृत अभ्यासक्रमही त्यांनी तयार केला आहे. विविध राष्ट्रीय संमेलनात राज्याचे तर आंतरराष्ट्रीय संमेलनात देशाचे प्रतिनिधित्व त्यांनी केले आहे. २०१८ मध्ये त्यांना




*श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते डॉ. मनमोहन उपाध्याय यांचा सत्कार*



*श्री. केदार तुंगीकर – विशेष वक्ते*



*पाठांतर स्पर्धेविषयी बोलताना श्री. विकासराव वालावलकर*

मध्यप्रदेश सरकारने 'संस्कृत शिक्षा सन्मानपत्र' देऊन तर २०२० मध्ये 'शास्त्र कला निधी' हा पुरस्कार मा. राज्यपालांच्या हस्ते देऊन गौरविले आहे.'

संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले आणि त्यानंतर अध्यक्ष महोदयांनी आपले स्थान ग्रहण केले.

पाठांतर कलेचे महत्त्व, पाठांतराची परंपरा, आधुनिक काळात या परंपरेला लागलेली उतरती कळा या गोष्टींचा ऊहापोह करून श्री. सरस्वते यांनी श्रीमहाराजांनी ५५ वर्षांपूर्वी सुरू केलेल्या पाठांतर स्पर्धेचा इतिहासच थोडक्यात सांगितला. त्याचप्रमाणे वेदाध्ययनाला चालना देण्यासाठी श्रीमहाराज आणि श्रीकाकामहाराज यांनी केलेल्या महत्त्वाच्या कामगिरीचाही उल्लेख केला. वेदाध्ययनाच्या परंपरेत परीक्षा घेऊन, गुण आणि श्रेणी दाखविणारी प्रमाणपत्रे देऊन परीक्षेला दिलेले पारदर्शी स्वरूप याविषयी माहिती देऊन त्यांनी या उपक्रमाचे महत्त्व अध्यक्ष, सत्कारमूर्तींसह सर्वांनाच अवगत केले आणि विशेष वक्ते श्री. केदार तुंगीकर यांना आपले विचार मांडण्यासाठी निमंत्रित केले.

श्री. तुंगीकर म्हणाले, 'माहिती-तंत्रज्ञानाच्या या युगात माणूस यंत्रांवर जास्त विसंबून आहे. त्यामुळे दिवसेंदिवस पाठांतर या विषयाकडे दुर्लक्ष होत आहे. पाठांतराची वृत्ती कमी होत आहे. त्यामुळे स्मरणशक्तीही कमी होत आहे. बुद्धी कार्यक्षम ठेवण्याचा पाठांतर हा उत्तम मार्ग आहे. पाठांतराच्या जोरावरच आपले वैदिक साहित्य परकीय आक्रमणे होऊनसुद्धा टिकून आहे. कितीही आधुनिक साधने आली तरी विद्यार्जनासाठी पाठांतरच उपयुक्त आहे. परीक्षेच्या वेळी ही साधने वापरता येत नाहीत. त्यावेळी पाठांतरच उपयोगी पडते. आधुनिक माध्यमे व्यापारी तत्त्वावर चालतात. त्यामुळे तेथील माहिती चुकीची असू शकते. ती विश्वासार्ह असेलच असे नाही. जेव्हा मोबाईल नव्हते तेव्हा अनेकांचे फोन नंबर आपणाला पाठ असायचे. आता मोबाईल बंद पडला तर पंचाईत होते. नंबर लक्षात ठेवण्याची आपली सवयच गेली आहे. म्हणून पाठांतर आणि आधुनिक साधने यांचा सुवर्णमध्य साधला पाहिजे. पाठांतराची कला जोपासलीच पाहिजे. आपली संस्था या स्पर्धेतून हीच कला जोपासायला उत्तेजन देत आहे. शाळा-कॉलेजात अशा स्पर्धा घेतल्या तर पाठांतराची गोडी लागेल आणि ही खास भारतीय परंपरा टिकून राहील.'

यानंतर मुख्य विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांनी आपले विचार व्यक्त केले, 'गेली ५५ वर्षे हा उपक्रम येथे सुरू आहे, दरवर्षी त्याला चांगला प्रतिसादही मिळत आहे. जे या स्पर्धेत भाग घेतात त्यांना त्यापासून नक्कीच लाभ होत आहे. किंबहुना श्रीमहाराजांचे सर्वच उपक्रम हे समाजाच्या कल्याणासाठीच असतात. कारण तेच त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट होते. पाठांतराचे फायदे सर्वांनाच माहीत आहेत. मनाच्या श्लोकांसारखे मराठी पाठांतर असेल तर अर्थही लगेच कळतो आणि आपल्यावर नकळत चांगले संस्कार होतात. बालवयात संस्कृत समजले नाही तरी योग्य वेळी त्याचेही आकलन होते आणि नकळत त्याही वयात त्याचा चांगला परिणाम होतो.

या स्पर्धेसाठी निवडलेल्या बहुतेक रचना श्रीमहाराजांच्या आहेत, त्या मधूर आणि अर्थपूर्ण आहेत. स्पर्धेत भाग न घेणाऱ्यांनी सुद्धा त्या रोज म्हणाव्यात. त्यामुळे माणसाची आध्यात्मिक उन्नती होण्यास हातभार लागतो. हे मी स्वानुभवाने सांगतोय. माझ्या आधीच्या वक्त्यांनी सांगितले की पाठांतरांचे महत्त्व आता कमी झाले आहे, ते खरेच आहे. आम्ही लहानपणी औटकीपर्यंत पाढे पाठ केले आहेत. आता तीसपर्यंतचे पाढेसुद्धा कोणी पाठ करीत नाही, मशिनवरचे आवलंबित्व एवढे वाढलेय की साधी आकडेमोडही आता कोणी कॅल्क्युलेटरशिवाय करीत नाही. मशीन बंद पडल्यामुळे सेल्समनला बील तयार करता येईना याचा अनुभव मी अमेरिकेत घेतला आहे. मशीन वापरू नये असे नाही, पण एवढे परावलंबित्वही असू नये. शास्त्रज्ञांच्या मते येत्या भविष्यात माणूस विस्मृतीच्या रोगाने ग्रासला जाईल. पाठांतर म्हणजे वाचलेले पुन्हापुन्हा आठवणे, त्यामुळे मेंदूला व्यायाम मिळतो आणि मेंदू वृद्ध होण्याची क्रिया मंदावते. डार्विनचा सिद्धांत आहे की जो अवयव वापरला जाता नाही तो कालांतराने निकामी होतो. उदा. माणसाचे शेपूट, तीक्ष्ण दांत. तसेच आपला मेंदूही निकामी होईल. म्हणून पाठांतर आवश्यक आहे.



वे. मू. प्रसाद निगुडकर : मानपत्र वाचन



डॉ. मनमोहन उपाध्याय यांच्या हस्ते पंडितप्रवर कुप्पा श्रीगुरू बिल्वेश शर्मा यांचा सत्कार.

श्रीमहाराजांनी सुरू केलेल्या हा उपक्रम सनातन म्हणजे नित्य नूतन आहे. तो कालबाह्य वा निरुपयोगी होणे शक्य नाही, त्यामुळे कॉम्प्युटर युगातही हा निरुपयोगी होणार नाही. फक्त आपणाला त्याची योग्य तेवढी जाणीव नाही. हल्ली स्पर्धकांची संख्या थोडी रोडावली आहे. पण याचे महत्त्व लक्षात येऊन भविष्यात ती नक्कीच वाढेल.

१९८२ साली पुण्यात वेदाध्यायी फार थोडे उरले म्हणून वेद अध्ययनाला चालना देण्यासाठी श्रीमहाराजांनी येथे पाठशाळा सुरू केली. आज घनपाठींची संख्यासुद्धा किती वाढली आहे ! हाही उपक्रम तसाच वाढेल असा मला विश्वास आहे आणि तशी मी श्रीमहाराजांच्या चरणी प्रार्थना करतो. आजच्या पारितोषिक विजेत्यांचे आणि पालकांचे अभिनंदन. ज्यांना यश मिळाले नाही त्यांचेही अभिनंदन! कारण त्यांनी महाराजांचा हा उपक्रम वाढीस लागावा म्हणून प्रयत्न केले आहेत.''

यानंतर विद्वज्जनांच्या सत्काराला सुरुवात झाली. पहिले सत्कारमूर्ती पंडितप्रवर कुप्पा श्री गुरुबिल्वेश शर्मा यांना देण्यात येणारे संस्कृत मानपत्र आणि त्याचा मराठी अनुवाद यांचे वाचन श्री. प्रसाद निगुडकर यांनी केले.

'आज या शुभप्रसंगी शास्त्री कुळातील शिरोमणी अशा पंडितप्रवर श्रीगुरु बिल्वेशशास्त्रींना सन्मानित करताना आम्हास अत्यानंद होत आहे. श्रीवेंकटकृष्णमूर्ती व शांतासुंदरीदेवी या दंपतीचे ठिकाणी जन्म झालेल्या श्रीमान् गुरुबिल्वेशशास्त्रींनी कुमारवयातच यजुर्वेदीय शाखेचे क्रमांत अध्ययन पूर्ण केले व शास्त्रविद्येच्या कुतूहलाने राजमहेंद्री येथील पातंजलभाष्याचे प्रगाढ अध्ययन असणाऱ्या पंडितवरेण्य श्री. कोमपेल्लसत्यनारायणशास्त्री यांचेकडे शुध्दतर अशी व्याकरणविद्या संपादित केली. तसेच पूर्वोत्तर मीमांसा शास्त्राचे प्रकांडपंडित श्री मणिद्राविडशास्त्री यांचेकडे उपनिषदातील वेदांततत्त्वाचे अध्ययन केले. आपण स्वतःच्या शास्त्रविद्येने वाराणसी येथील संपूर्णानंद विश्वविद्यालयाला जणू काही अलंकृतच केले आहे. तसेच विद्वत् सभांमध्ये व्याकरणकुलश्रेष्ठ अशा आपल्या घनगंभीर शास्त्रनिरुपणाने इतर विद्वानांचे प्रतिपादन अगदीच सामान्य वाटते. आपण शास्त्र अध्यापनाने आमचे परमगुरु श्रीवासुदेवानंतसरस्वती स्वामी महाराज यांचा वेदशास्त्रविद्येचे संवर्धन व्हावे हा मनोरथच सफल करीत आहात.
श्रीसद्‌गुरूवासुदेवानंतसरस्वती स्वामी महाराजांच्या जयंती उत्सवाला अनुलक्षून श्रीसद्‌गुरूवासुदेवानंतसरस्वती सेवा मंडळ आपणास अतिशय आनंदाने "शास्त्रकलानिधी" ही पदवी व श्रीफल, महावस्त्र व रुपये एकावन्न हजार प्रदान करीत आहे. वेदभगवतकृपेने आपणाला दीर्घायुरारोग्य व सच्छिष्य परंपरा प्राप्त होओ व आपला शारदीय कीर्तिचंद्र असाच नित्य शास्त्र नभोमंडलावर झळकत राहो ही सद्‌गुरुचरणी प्रार्थना. भवदीय

- अशोक रघुनाथ जोशी, विश्वस्त,
श्रीसद्‌गुरूवासुदेवानंतसरस्वती सेवा मंडळ.'

मानपत्र वाचनानंतर अध्यक्ष महोदयांच्या हस्ते पंडितप्रवर कुप्पा श्रीगुरु बिल्वेश शर्मा यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र व महादक्षिणा रु. ५१,०००/- देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती म्हणाले, ''आत्तापर्यंत झालेल्या भाषणातून पाठांतरांचे महत्त्व सांगण्यात आले. आज आपण शब्दार्थ पुस्तकांमधून किंवा ॲपमधून बघतो. परंतु आपल्या विद्यार्जनाच्या परंपरेप्रमाणे अमर कोष, विश्व कोष, मंदाकिनी कोष असे शंभरापेक्षा




*पंडितप्रवर कुप्पा श्रीगुरू बिल्वेश शर्मा सत्काराला उत्तर देताना*

जास्त कोष आहेत. त्यातील तीन-चार कोष हे लहान पाच वर्षांच्या मुलांना शिकवण्यासाठी आहेत. त्यांनी ते पाठ करायचे आणि मग पुढील कोष कंठस्थ करायचे. ज्याला शब्दकोश पाठ आहेत त्याच्याजवळ शब्दांच्या राशी आहेत. आता हा आमचा दोष आहे की बदललेल्या परिस्थितीचा, हे माहीत नाही, पण आपण परंपरागत शिक्षण पद्धतीपासून दूर गेलो. पण आपणाला त्याच जुन्या प्रणालीकडे जावे लागेल. त्या दृष्टीने वाटचाल सुरू झाली आहे. यावरून मला दोन प्रसंग आठवतात.

रामकृष्ण परमहंस हे स्वामी विवेकानंदांना अन्य विद्यार्थ्यांपेक्षा वेगळी वागणूक द्यायचे. त्याचे अन्य हुशार विद्यार्थ्यांना वैषम्य वाटायचे. त्यांनी एकदा रामकृष्णांना विचारले की तुम्ही आम्हाला आश्रमाबाहेर जाऊ देत नाही आणि विवेकानंदांना कोठेही परदेशीसुद्धा पाठविता. आम्हाला वागणुकीचे कडक नियम, बंधने आहेत. त्याला कसले निर्बंध नाहीत. असे का? तेव्हा ते म्हणाले की पितळेच्या भांड्याला नेहमी घासावे लागते तेव्हाच ते स्वच्छ होते आणि चमकते. सुवर्णपात्राला तसे करावे लागत नाही. त्याने विद्यार्थ्यांचे समाधान झाले नाही म्हणून रामकृष्ण म्हणाले की तुम्ही शंभर लोक जे काम करता त्याचे सार तो एकटा लोकांपर्यंत पोहोचवतो.

महाकवी कालिदासांच्या बाबतीत अशीच एक गोष्ट आहे. त्यांचा समकालीन मुरारी हा कवीसुद्धा त्यांच्या तोडीचा प्रतिभावंत होता पण त्याला तेवढा सन्मान मिळाला नाही. तोही म्हणतो की ज्ञान संपादन सगळेच करतात पण त्याचे सार जो लोकांपर्यंत पोहोचवितो तो खरा प्रतिभावान!

आपण सगळे ज्ञान संपादन करतो पण खरी परीक्षा अध्ययन पूर्ण झाल्यावर असते. आपण मिळविलेले ज्ञान आपण किती लोकांपर्यंत पोहोचवले हे महत्त्वाचे. सध्या धर्माबद्दल बिकट परिस्थिती आहे. जे वेदाध्यायन करतात त्यांनाच आपल्या धर्माबद्दल पूर्ण माहिती नाही. ते केवळ वाचन, पाठांतर करतात पण त्यांना आचार-नियमांबद्दल पूर्ण माहिती नाही. बरेच लोक म्हणतात की तुमच्या धर्माबद्दल काही विशेष माहिती सांगा. परंतु त्यांच्याजवळ केवळ पाठांतरित शब्द असल्याने ते काही सांगू शकत नाहीत. हे सर्वांच्याच बाबतीत आहे असे नव्हे. परंतु आपल्या ऋषी-मुनींनी आपली पुरातन विद्यार्जनाची पद्धती अतिशय विचारपूर्वक आखलेली आहे. आपली परंपरागत विद्या गुरुकुलात व्हायची. ती गुरुकुले रानावनात असतं त्यामुळे परकीय आक्रमणापासून ती सुरक्षित असत. एक गोष्ट तुम्हाला सांगतो. एकदा गंगा किनारी एक न्यूझीलंडचा पर्यटक मला भेटला. माझी वेशभूषा पाहून तो माझ्याशी कुतूहलाने बोलू लागला. प्रश्न विचारू लागला. मी त्याला विचारले तुम्ही कोण आहात? तो म्हणाला मी न्यूझीलंडचा संगणकतज्ज्ञ आहे, आम्ही न्यूझीलंडच्या संस्कृतीसंबंधी एक नाटक बसवीत आहोत. पण आम्हाला आमच्या भूतकालीन संस्कृतीबद्दल लिखित स्वरूपात काहीच मिळत नाही. आपण भाग्यवान आहात की आपल्या संस्कृतीसंबंधी, चालीरीतीसंबंधी सर्वकाही लिखित स्वरूपात उपलब्ध आहे. ही संस्कृती कशामुळे टिकून आहे? अन्य कोणत्याही देशात मूळ संस्कृती टिकून राहिलेली नाही. पण भारतातील संस्कृती टिकून आहे यांचे कारण आपली गुरुकुल पद्धती अरण्यात वाढली; नागरी भागात नाही. अध्ययन पूर्ण झाले की मग नागरी भागात येऊन ते ज्ञानदान करीत.

आता कालपरत्वे कॉम्प्युटर, इंटरनेट असे बदल झाले आहेत. पण मी येथे आलो तेव्हा माझ्या लक्षात आले की आपल्या पुरातन पद्धतीप्रमाणेच, तशाच वातावरणात येथे ज्ञानदान होत आहे.

कालिदासांच्या संदर्भात मघाशी जे सांगितले त्याप्रमाणे परीक्षेनंतरच आपले खरे काम सुरू होते, आपले अध्ययन लोकांपर्यंत पोहोचविणे. आम्ही वेदपाठी आहोत, शास्त्रपाठी आहोत असे आपण जगाला दाखवून देतो, त्याचे महत्त्व आपणाला लोकांना सांगता आले पाहिजे. वेद म्हणजे नुसते शब्द नसून त्यातील अर्थ आपणाला लोकांना सांगता आला पाहिजे. वेदात विमान तयार करण्याची माहिती आहे असे नुसते बोलून उपयोगी नाही. लोक म्हणतील की ते करून दाखवा. त्यात चूक काहीच नाही, ते तंत्रज्ञानाने त्यांनी करून दाखविले आहे. आपल्याला ते करता आले पाहिजे, त्यासाठी आपल्याला अभ्यास वाढवून त्या तंत्रज्ञानाचाही अभ्यास केला पाहिजे. आजकाल मोबाईलमुळे ते सहज मिळू शकते, वेळ नाही असे म्हणून चालणार नाही. आपल्याकडे वेळ आहे, तंत्रज्ञान आहे, समजून घेण्याचे सामर्थ्य आहे. पण करण्याची इच्छा हवी. आपण केवळ भारतीय नाही, केवळ हिंदू नाही तर ज्याप्रमाणे प्रत्येक जण सैनिक बनू शकत नाही पण आपण हे नक्की सांगू शकतो की आमच्या विज्ञानात सर्व गोष्टी आहेत आणि आम्ही त्या करून दाखवायला तयार आहोत. आमच्याकडे मूलभूत ज्ञान आहे, हे सांगण्यासाठी आपल्याला काही प्रयत्न करावे लागतील. शंभर ज्ञानी लोक जेव्हा प्रयत्न करतील तेव्हा एक विवेकानंद निर्माण होतील. यासाठी वेदाध्यायी, शास्त्री, पंडित या सर्वांनी एकत्र येऊन या समाजाप्रती माझे काय कर्तव्य आहे, काय जबाबदारी आहे, याचा विचार करून एक कणभर काम केले तरी ते मोठे काम ठरेल. त्यासाठी पैसे देण्याची गरज नाही पण ज्या समाजाने आपल्याला एवढे दिले त्या समाजासाठी आपण काय देऊ शकतो यांचा विचार केला पाहिजे, वानरसेनेने रामाबरोबर



*डॉ. मनमोहन उपाध्याय यांच्या हस्ते वे. मू. अथर्व पटवर्धन यांचा सत्कार*

जाऊन कोणी इंजिनीअर करणार नाही असे सेतू बांधण्याचे काम करून दाखविले. मुरारी म्हणतात समुद्राची खोली किती आहे हे वानरांना विचारून कळणार नाही. कारण त्यांनी रामनाम घेत समुद्रात दगड टाकले आणि सेतू बांधला. तेव्हा हा प्रश्न इंद्राला घाबरून समुद्रात तळाशी जाऊन लपलेल्या मैनाक पर्वताला विचारा, विद्याव्यासंगी लोक मैनाक पर्वतासारखे आहेत जे विद्येच्या मुळाशी जाऊन, गुरुकुलात राहून कष्ट करून अभ्यास करतात. त्यासाठी गुरुकूल पद्धतीची पुन:स्थापना होणे गरजेचे आहे. आपण मला बोलावून माझा सन्मान केलात त्याला मी पात्र आहे की नाही हे मला माहीत नाही. पण या वातावरणात आल्यावर एखाद्या ऋषीच्या आश्रमात आल्यासारखे वाटले. मी महाराजांजवळ प्रार्थना करतो की मला येथे परत परत येण्याचे भाग्य लाभावे ''

दुसरे सत्कारमूर्ती वे.मू. अथर्व पटवर्धन यांचाही परिचय मानपत्र वाचनाद्वारे करून देण्यात आल्यावर शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र व महादक्षिणा रु. ५१,०००/- देऊन अध्यक्षांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.




*वे. मू. अथर्व पटवर्धन सत्काराला उत्तर देताना*




*कु. चिन्मय प्रसाद खाडीलकर पाठांतर स्पर्धेचे पारितोषिक स्वीकारताना*

**मानपत्राचा मराठी अनुवाद–**
***वेदमूर्ती अथर्व संजय पटवर्धन –***

जीवमात्रांच्या शुभाशुभ कर्मांचे संचयन असणाऱ्या अग्रसंधानीसंज्ञक पुस्तिकेमध्ये परिगणित अशा अपूर्व पुण्याईने पटवर्धन कुळामधील अर्चना व संजय या दम्पतीच्या ठिकाणी जन्म प्राप्त करून लहान वयातच विद्वतप्रवर वेदमूर्ती श्री. वसंत फडकेगुरुजी यांनी स्थापन केलेल्या अलंकापुरीचे जणू भूषण असणाऱ्या श्रीनृसिंहसरस्वती पाठशाळेमध्ये जोशी कुलोद्भव विद्वद्वरेण्य वेदमूर्ती श्री. प्रथमेश गुरुजींचे शिष्यत्व स्वीकारून ऋग्वेदाचे सदशग्रंथ घनांत अध्ययन करून अनेक वैदिक मंडळींमध्ये आपल्या विद्वत्तेचे प्रकटीकरण करत सांगवेदविचक्षण, षडंगवित् इत्यादी उपाधींने विभूषित असे अग्रगण्य वैदिक असणारे वेदमूर्ती श्रीमान अथर्वशर्मा यांना सन्मानित करताना आमचे अंतःकरण हर्षोल्हासीत होत आहे. आपण स्वतःच्या निर्दोष अशा अस्खलित वाणीने कंठस्थ सदशग्रंथ घनपारायण करून भगवान श्रीसिध्दीविनायकाला संतुष्ट केले. आमचे गुरुवर्य श्रीवासुदेवानंतसरस्वती स्वामी महाराज यांची आपणासारख्या विद्वानांबद्दल मोठी आस्था होती.



*वे. मू. समर्थ कुलकर्णी वेद परीक्षा प्रमाणपत्र स्वीकारताना*




*कु. अवंती विश्वनाथ माळवदकर पाठांतर स्पर्धेचे पारितोषिक स्वीकारताना*

श्रीसद्गुरूवासुदेवानंतसरस्वती स्वामी महाराजांच्या जयंती उत्सवाला अनुलक्षून श्रीसद्गुरूवासुदेवानंतसरस्वती सेवा मंडळ आपणास अतिशय आनंदाने "वेदकलानिधी" ही पदवी व श्रीफल, महावस्त्र व रुपये एकावन्न हजार प्रदान करीत आहे. वेदभगवतकृपेने आपणाला दीर्घायुरारोग्य व सच्छिष्य परंपरा प्राप्त होओ व आपला शारदीय कीर्तिचंद्र असाच नित्य वैदिक नभोमंडलावर झळकत राहो ही सद्गुरुचरणी प्रार्थना .

भवदीय - अशोक रघुनाथ जोशी, विश्वस्त,
श्रीसद्गुरूवासुदेवानंतसरस्वती सेवा मंडळ.'

सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती म्हणाले, 'आळंदीच्या नृसिंहसरस्वती वेदपाठशाळेत वे. मू. फडकेगुरुजींनी मला प्रवेश दिला आणि प्रेमाने सर्व शिक्षण दिले म्हणून आज मी येथे उभा आहे. वे. मू. उपाध्येगुरुजी आणि वे.मू. प्रथमेशगुरुजी यांनी दशग्रंथांसहीत घनापर्यंत अध्ययन करवून घेतले. कोणाच्याही शैक्षणिक यशात त्याच्या गुरूंचा वाटा मोठा असतो. माझ्याही बाबतीत तो माझ्या गुरूंचाच आहे. वासुदेवानंतसरस्वती वेदपाठशाळेचे अध्यापक व नृसिंहसरस्वती पाठशाळेचे विश्वस्त श्री. मंदार फडकेगुरुजी हे



*वे. मू. प्रथमेश पुरोहित वेद परीक्षा प्रमाणपत्र स्वीकारताना*




*डॉ. मनमोहन उपाध्याय: अध्यक्षीय भाषण*

पण आम्हा विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी सारखे झटत असतात. शिकण्याचे खूप बाकी आहे. विद्या आणि सत्ता मिळवणे एक वेळ सोपे आहे पण ती टिकविणे कठीण आहे. मला मिळालेली विद्या माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत टिकून राहण्यासाठी माझे सतत प्रयत्न राहावेत हीच प्रार्थना. माझ्या यशात सहस्रबुद्धे समाधिमंदिरांचा मोठा हिस्सा आहे. एक आठवण अजून मनात ताजी आहे. मी शाखेची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर श्रीकाकांनी मला एक घड्याळ बक्षीस दिले होते. ते मी अजून वापरतो. श्रीकाकांच्या अशा प्रोत्साहनामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढतो आणि पुढे शिकण्यासाठी स्फूर्ती मिळते. माझी घनाची आवृत्ती पूर्ण झाल्यावर श्रीकाकांनी नव्या पिढीसाठी सामूहिक घनपारायण आयोजित केल आणि त्यात मला समाविष्ट करून घेतले. त्यामुळे एकट्याने घनपारायण करण्याचे बळ मला प्राप्त झाले. म्हणून मी असे म्हणेन की प्रेमाने वाढविलेला मुलगा आता मोठा झाला म्हणून आईने पाठीवर दिलेली ही थाप आहे. गुरुसंकुलाने आणि समाधिमंदिराने केलेले हे कौतुक मी आदराने स्वीकारतो आणि त्यांच्याच चरणी अर्पण करतो.''

त्यानंतर समारंभातील मुख्य कार्यक्रम म्हणजे वासुदेवानन्त सरस्वती सेवा मंडळातर्फे ज्या वैदिक तथा अन्य पाठांतराच्या परीक्षा घेण्यात आल्या त्याचे निकाल व स्पृहणीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्र व पारितोषिक वितरण समारंभ सुरू झाला. त्याविषयी बोलताना सूत्र संचालक श्री. सरस्वते म्हणाले,

''ऋग्वेद, कृष्णयजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद या चारही वेदांबरोबरच मनाचे श्लोक, गुरुपरंपरेतील अष्टके इत्यादींच्याही पाठांतर परीक्षा घेण्यात आल्या. यंदाच्या वर्षी महाराष्ट्रातील विविध गावातीलच नव्हे तर गोवा, कर्नाटक, तामिळनाडू आणि तेलंगणा या विविध राज्यातील एकूण ३६ वेदपाठ शाळेतील विद्यार्थ्यांनी या पाठांतर स्पर्धेसाठी नावे नोंदवली. या दोन्ही स्पर्धेत मिळून एकूण ३०१ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. सहा दिवस सकाळ, दुपार व संध्याकाळ या तिन्ही सत्रात एकूण २७ परीक्षकांनी सहा दिवस परीक्षा चाचण्या घेतल्या. त्यात २७६ पैकी २४७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ५ राज्यातील ३६ वेदपाठशाळेतील ३०१ विद्यार्थ्यांनी नोंदविलेला सहभाग हा आजपर्यंतचा विक्रम आहे. प्रतिवर्षी आपल्या या स्पर्धेची लोकप्रियता राज्याराज्यात पसरत आहे. पाठांतर या कलेला प्रोत्साहन द्यायचा प्रयत्न फलदायी होताना दिसत आहे.'

प्रमाणपत्रांच्या वितरणानंतर अध्यक्षांच्या हस्ते, वे.मू. मुरवणेगुरुजी, कणकवली यांच्या वेदपाठशाळेस रु. ५०,०००/- रोख अनुदान देण्यात आले. सेवामंडळातर्फे प्रतिवर्षी वेदपाठशाळांना असे अनुदान देण्यात येते. त्यानंतर अध्यक्षीय भाषण झाले.

अध्यक्ष डॉ. मनमोहन उपाध्याय आपल्या भाषणात म्हणाले, ''या कार्यक्रमाच्या निमित्ताने वाराणसी आणि पुणे येथील दोन विद्वानांचा सत्कार होत आहे. त्याबद्दल मी त्यांचे आपणासर्वांतर्फे आणि माझ्यातर्फे अभिनंदन करतो. वे.मू. अथर्व पटवर्धनांचे गुरुजी

वे.मू. फडकेगुरुजी समोरच बसले आहेत. त्यांनी अथर्व यांच्यासारखे अनेक विद्वान घनपाठी घडविलेले आहेत. एकोहमबहुस्याम्' अशी त्यांची धारणा आहे. एकट्याने काय होणार? म्हणून त्यांनी ट्रस्टींची योजना केली आहे. त्याचप्रमाणे आपण अजूनही अनेक घनपाठी घडवावेत, अशी त्यांचीही इच्छा असेलच. बिल्वेशशास्त्रीजी काशीच्या संपूर्णानंद विश्वविद्यालयात व्याकरणाचे अध्यापक आहेत. मी गेली ३०-३५ वर्षे सामाजिक क्षेत्रात काम करीत आहे. माझ्या अनुभवावरून मी असे म्हणेन की विश्वविद्यालयात गेल्यावर अनेक प्रकारच्या मर्यादा तेथे पडतात, आमच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांमुळे त्या पडतात. त्यामुळे आमचे मुख्य कार्यच मोठ्या प्रमाणावर बाधीत होते. त्यामुळे आपण स्वतंत्रपणे येथे आपल्यासारखे लोक तयार करण्याचे जे कार्य करीत आहात, ते अधिक वेगाने करू शकाल असा मला विश्वास आहे. आणि ते तसे व्हावे अशी तीव्र इच्छाही आहे ! आणि त्यामुळे आपण सत्काररूपाने हे जे प्रोत्साहन देण्याचे काम करीत आहात, त्याचेही सार्थक होईल.

मी श्रीकाकांना पूर्वी ओळखत नव्हतो. फडकेगुरुजींचे नाव ऐकले होते. आज या दोघांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. यामुळे माझ्या भाग्याचा उदय झाला आहे असे मला वाटते. आपण मला या समारंभासाठी निमंत्रित केलेत म्हणून मी आपले सर्वांचे आभार मानतो.

श्री. विकासराव म्हणाले त्याप्रमाणे पूर्वी आपण अनेक फोन नंबर लक्षात ठेवत होतो. आकडेमोडीसाठी कॅल्क्युलेटर लागत नव्हता. पण आता आपली मेधा, बुद्धी कशी कुंठित झाली आहे याचा आपणा सर्वांना अनुभव आहेच. आपल्या परंपरेत घनपाठी, जटापाठी लोकांना कितीतरी मंत्र पाठ करावे लागायचे. वेदांच्या संरक्षणाची आपली ही परंपरा जिच्यामुळे आपला धर्म, संस्कृती, साहित्य यांचे रक्षण झाले, तशी अन्य कोणत्याही धर्मात अगर संस्कृतीत मिळणार नाही.

आमच्या पूर्वजांनी अशी व्यवस्था निर्माण केला की ज्यामुळे आमची शास्त्रे जिवंत राहिली. म्हणूनच आजही आपली शास्त्रपरांपरा हजारो वर्षे अक्षुण्णपणे प्रवाहित राहिली आहे. आम्ही शेकडो वर्षे गुलामीत राहिलो. हजारो आक्रमणे आमच्यावर झाली. आमची संस्कृती नष्ट करण्याचे प्रयत्न झाले. आमचे ग्रंथ जाळून टाकण्यात आले. आमचे मानबिंदू नष्ट करण्याचा प्रयत्न झाला. तरीही आमचे वेद, आमची पुराणे, आमचे ग्रंथ आजही अक्षुण्ण कसे आहेत? त्याचे कारण म्हणजे रानावनात, गावागावात, नगरानगरात वेदांचे संरक्षण करणारे लोक होते. तेच त्यांचे जीवनकर्तव्य, ध्येय होते. ते आपले शिष्य असे तयार करीत, की जे ही परंपरा पुढे नेत, तिचे संरक्षण करीत होते. म्हणूनच आमचे वेद, आमची पुराणे, आमचे ग्रंथ, आमचा धर्म आणि संस्कृती वाचली आहे. देशावर मुसलमानांनी आक्रमणे केली. जबरदस्तीने धर्मांतर करविले. इंग्रजांनी मारपीट, जुलूम केला नाही. पण मेकॉले नावाचा एक माणूस या देशात आला आणि १८५० साली त्याने या देशात एक पाहणी केली. बाराव्या शतकापासून या देशात पारतंत्र्य आले. आठशे वर्षे गुलामगिरीत राहूनही भारतीयांचा धर्म, संस्कृती, वेद पुराणे वाचलेली आहेत, याचे कारण काय ? या पाहणीला दीड वर्षापेक्षा जास्त वेळ लागला. निष्कर्ष असा होता की देशात सात लाख बत्तीस हजारपेक्षा जास्त गुरुकुले आहेत. या गुरुकुलात शिकलेली मुले आपला धर्म, संस्कृती यांचे रक्षण करीत आहेत. म्हणून हा देश आपली संस्कृती टिकवून आहे. मेकॉलेने आपल्या वडिलांना लिहिलेले पत्र गुगलवर उपलब्ध आहे. त्यात तो म्हणतो की मी भारताच्या शिक्षण व्यवस्थेत असे परिवर्तन आणीन की येथे शिक्षण घेणारे शरीराने भारतीय असतील पण त्यांचे मन, बुद्धी, मेंदू इंग्रजाळलेले असेल. ते ''काळे इंग्रज'' असतील.

आणि त्यानंतर गुरुकुल पद्धती नष्ट करण्याचे षड्यंत्र रचले गेले. गुरुकुले बंद केली गेली. तेथे शिकणाऱ्यांच्या शिष्यवृत्त्या आणि शिकवणारांचे वेतन बंद केले गेले. मी पाहिले आहे, शाळेत पदार्थ विज्ञान-रसायनशास्त्र किंवा इंग्रजी शिकविणाऱ्या शिक्षकांना संस्कृत शिकविणाऱ्या शिक्षकांपेक्षा खूप जास्त पगार असे. आज देशात या काळ्या इंग्रजांची मोठी फौज तयार आहे. या फौजेशी लढायला कोणी सैनिक तयार करीत आहे का ? ज्यांचा भारतीयत्वावर विश्वास आहे असे ट्रस्ट, अशी मंडळे ते काम करीत आहेत. त्यांच्याकडूनच आपला देश, धर्म, संस्कृती यांचे संरक्षण होणार आहे.

भारत स्वतंत्र झाल्यावर संस्कृतसाठी, वेदांसाठी जेवढे काम व्हायला हवे तेवढे ते झालेले नाही, कारण त्या वेळी ज्यांच्या हाती सत्ता होती त्यांना वेदांबद्दल, संस्कृत भाषेबद्दल प्रेम नव्हते, भारतीय संस्कृतीबद्दल प्रेम नव्हते. ते 'अपघाताने झालेले' हिंदू होते. त्यामुळे पंचाहत्तर वर्षे होऊन गेल्यावरही आपल्या शिक्षण पद्धतीत कोणताही बदल केला गेलेला नाही. इंग्रजांच्या वेळची शिक्षणपद्धती २०२० पर्यंत तशीच सुरू होती. पंतप्रधान मा. मोदींच्या आगमनामुळे आता त्यात काही बदल केले जात आहेत. सगळे सांगत नाही, एक छोटेसे उदाहरण देतो. एक म्हणजे आता पाचवीपर्यंतचे शिक्षण मातृभाषेत दिले जाईल किंवा प्रादेशिक भाषेत दिले जाईल किंवा बोलीभाषेत दिले जाईल. विद्यार्थी पाचवीपर्यंतचे शिक्षण मराठी, गुजराथी, हिंदी, मल्याळम्, काश्मिरी अशा कोणत्याही भाषेत घेऊ शकतो. पाचवीनंतर अन्य कोणत्याही भाषेचे शिक्षण घेता येईल. आठवी-नववीत एखादी अभिजात भाषा संस्कृत, कन्नड, तमिळ, मल्याळम् शिकू शकेल, अगदी मेडीकलला गेला तरी तो संस्कृतमध्ये अध्ययन करू शकेल. आत्तापर्यंत मेडिकल अथवा इंजिनीयरिंगचे ग्रंथ इंग्रजीत होते, आमच्या मध्यप्रदेशात एम्.बी.बी.एस.चे शिक्षण हिंदीतून करण्याची सोय झाली आहे, आता महाराष्ट्रातही पुढील दोन

वर्षांत डॉक्टरी किंवा इंजिनीयरिंगचे शिक्षण मराठीतून मिळेल अशी या नव्या पद्धतीत रचना केलेली आहे. संस्कृत ही अगदी अल्प लोकांची मातृभाषा आहे. ती प्रादेशिक भाषा नाही, बोलीभाषा पण नाही. पण ती अभिजात भाषा आहे. त्यामुळे त्या भाषेत मेडिकल अथवा इंजिनीयरिंगचा अभ्यास करता येईल अशी या नव्या पद्धतीत व्यवस्था केलेली आहे. आणि त्यासाठी भारत सरकारचे अभिनंदन!!

स्वातंत्र्यानंतर प्रथमच अशी व्यवस्था होत आहे. त्याविषयी भूमिका मांडताना असे म्हटलेले आहे की आज एवढ्या वर्षांत एकही चरक, सुश्रुत, कालिदास, कौटिल्य, पाणिनी आपण निर्माण करू शकलो नाही कारण आपली शिक्षणपद्धती भारतासाठी अनुकूल नाही. तर ती पाश्चात्यधार्जिणी आहे. म्हणून ती भारतीय संस्कृतीसाठी, भारतासाठी अनुकूल बनविली तरच भारत आपले गतवैभव पुन्हा प्राप्त करू शकेल.

इंग्रजांनी अनेक षड्यंत्रे रचली. वेद केवळ कर्मकांडची भाषा आहे असा प्रचार केला. वेदात केवळ कर्मकांड नाही, वेदात धातू विज्ञान, चिकित्सा शास्त्र अशी अनेक शास्त्रे आहेत पण वेदातील विज्ञान जगापुढे ठेवू शकतील असे विद्वान दुर्मिळ झाले आहेत. आज अशा लोकांची गरज आहे. इंग्रजांनी अपप्रचार केला की वेद केवळ कपोलकल्पित आहेत. ते अपौरुषेय नाहीत. आम्हाला अपमानीत करण्यासाठी ते असे म्हणत असत. म्हणजे हिंदुत्ववादी, भारतीय संस्कृतीवर विश्वास ठेवणारे लोक विचलित होतील.

पण शासकांमध्ये इच्छाशक्ती असेल तर परिवर्तन होण्याला वेळ लागत नाही. तुर्कस्तानात हाती सत्ता येताच केमाल पाशा याने आपल्या शिक्षणमंत्र्याला विचारले की तुर्की ही राजभाषा करण्यासाठी किती कालावधी लागेल? तो म्हणाला, पंधरा वर्षे ! केमाल पाशा त्याला म्हणाला की तो कालावधी आत्ता या क्षणाला संपला आहे असे समज. आणि आत्ता या क्षणापासून तुर्की राजभाषा झाली आहे. जर आपल्या शासकांमध्ये अशी इच्छाशक्ती असती तर संस्कृत केव्हाच राजभाषा, संपर्क भाषा झाली असती. मी तामिळनाडू अथवा काश्मीरमध्ये गेलो तर तेथील स्थानिक भाषा मला येत नाही पण मी संस्कृतमधून माझे काम करू शकतो, कारण संस्कृत सर्व भाषांची जननी आहे. संस्कृत देशाला एका सूत्रात बांधू शकते आणि संस्कृतच्या माध्यमातून देश पुन्हा गतवैभव प्राप्त करू शकतो.

मी नागेशभट्ट यांच्या भूमीत उभा आहे. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या भूमीत मी उभा आहे. आमचे जे संस्कृतचे विद्वान होते ते ते सगळे कसलीही अपेक्षा न करता काम करायचे. नागेशभट्ट यांनी व्याकरणाचे अनेक ग्रंथ लिहिले. अनेक ग्रंथांचे संपादन केले. आर्ष ग्रंथातील अनावश्यक भाग काढून टाकला. महाराष्ट्रातून ते काशीला गेले. त्यांनी अनेक हस्तलिखितांचा संग्रह केला. परिस्थिती अशी होती की कधीकधी एक वेळचे जेवणसुद्धा मिळायचे नाही. पण ते विचलित झाले नाहीत. शरीर थकले, पाठीला कुबड आले. चालायला जमेना. कुबडामुळे नीट बसता येईना. मग भिंतीत खोबण करून घेतली. त्यात कुबड सारून ते बसत. पण ते आपले काम करीतच राहिले. जेव्हा हे श्रीमंत बाजीराव पेशव्यांना समजले तेव्हा त्यांना काही मदत करावी या हेतूने ते स्वत: नागेशभट्टांना भेटायला आले आणि त्यांनी विचारले की आपणाला काही मदत हवी आहे का? त्या वेळी नागेश भट्टांनी एक भूर्जपत्र पुढे करून विचारले की मला या सूत्रांचा काही अर्थ लागत नाही आहे. तेव्हा आपण याबाबत काही मदत करू शकाल का? बाजीरावांनी त्यांना साष्टांग नमस्कार घातला आणि म्हणाले की अशाच महापुरुषांमुळे आमचा देश आमची संस्कृती सुरक्षित आहे. मी आज अशा भूमीत आहे की जेथील विद्वान तपस्व्यांनी आपला धर्म, आपली संस्कृती, आपल्या परंपरा यांचे रक्षण केले आहे. त्यामुळेच अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्याची प्रेरणा लोकांना मिळते. त्यांचा उत्साह वाढतो. भाषणाने परिवर्तन होत नाही. परिवर्तन चारित्र्याने होते. भगवंतांनी गीतेत सांगितले आहे की श्रेष्ठ लोक जसे आचरण करतात त्याचे अनुकरण सामान्य लोक करतात. आमची इच्छा आहे की आपली संस्कृती टिकून राहावी. आपल्या मुलांनी आपली संस्कृती समजून घ्यावी. पण आपल्या मुलाने वेदाध्ययन करावे असे खरोखर आपणाला वाटते का? व्याकरण, न्याय, मीमांसा यांचा अभ्यास त्याने करावा असे आपणाला वाटते का? श्री शिवाजीमहाराज जन्माला यावेत पण ते माझ्या घरात नको ! जेव्हा लोकांना वाटेल की माझा मुलगा श्री शिवाजीमहाराज बनावा, मुलगी जिजामाता बनावी तेव्हाच भारतात परिवर्तन होईल आणि भारतमाता जगद्वंद्य होईल. त्यासाठी आपण निमित्त व्हावे अशी प्रेरणा अशा कार्यक्रमातून मिळते. ''

वे. मू. निगुडकर यांनी आभारप्रदर्शन केल्यानंतर वरयाचना पठणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

सायंकाळी त्रिपूर पूजन आणि तुलसीविवाह साग्रसंगीतपणे अत्यंत उत्साहात साजरा झाला.



*तुलसी विवाह*

**मंगळवार, दि. ८ नोव्हेंबर २०२२; कार्तिक पौर्णिमा, शक १९४४ श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे जयंती दिन**

श्रीबाबामहाराजांचा जयंती उत्सव श्रीमहाराजांनी प्रस्थापित केलेल्या परंपरेप्रमाणे अत्यंत भक्तिभावाने साजरा झाला. सकाळी भक्तगणांचे सामुदायिक नामस्मरण, सामुदायिक उपासना, उपनिषदपठण, लघुरुद्राभिषेक, आचार्य पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन आदी कार्यक्रमानंतर श्रीबाबांच्या मंदिरात ह.भ.प. पद्मनाभ व्यास यांनी जन्मोत्सवाचे कीर्तन केले. जन्मोत्सवाचा सोहळा अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. त्यानंतर महाप्रसाद झाला. सायंकाळी 'श्रीं'ची रथातून समाधिमंदिराभोवती पालखीप्रदक्षिणा काढण्यात आली. भक्तगणांनी अत्यंत उत्साहाने नाचत, भजन करीत या सोहळ्यात भाग घेतला.



*आचार्य पद्मनाभ व्यास : प्रवचन*



*ह. भ. प. पद्मनाभ व्यास : जन्मोत्सव कीर्तन*














*जन्मोत्सव सोहळा : क्षणचित्रे*

**बुधवार, दि. ९ नोव्हेंबर २०२२; कार्तिक वद्य १, शक १९४४**

सकाळी भक्तगणांचे सामुदायिक नामस्मरण, सामुदायिक उपासना, उपनिषदपठण, लघुरुद्राभिषेक, आचार्य पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन आदी कार्यक्रमानंतर, सायंकाळी डॉ. किशोर पाकणीकर यांचा सत्कारसोहळा झाला. त्यानंतर रात्रौ १०.०० ते २०० या काळात लळीताचे कीर्तन होऊन प्रसादवाटपानंतर श्रीबाबांचा धावा करण्यात येऊन उत्सवाची सांगता झाली.















**मालक, मुद्रक, प्रकाशक** : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर, ९३७ डी, ज्ञानेश्वर पादुका चौकाजवळ, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६ येथून प्रकाशित केले.
**संपादक** : श्री. विनायक चिंतामण पराडकर, अध्यक्ष, श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती सेवामंडळ. दूरभाष क्र.: ०२०-२५६५५०२१